# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

# विद्यापीठ मार्गदर्शिका

## मागासवर्गीयांच्या उपयोगासाठी

## २०१९-२०२०

वर्ष १९वे


मुद्रक -

**श्री. प्रेमानंद खरड**

**व्यवस्थापक** (अति. कार्य.),

राष्ट्रसंत तुकडोजी **महाराज नागपूर विद्यापीठ मुद्रणालय,**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर,

रवींद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर - ४४० ००१.

प्रकाशक -

**डॉ. निरज खटी**

**कुलसचिव** (officiating)

**राष्ट्रसंत** तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर,

रवींद्रनाथ टागोर मार्ग, **नागपूर - ४४० ००१.**

(२) वरील खुल्या प्रवर्गातील यादीत समाविष्ट असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा नंतर खालोखाल गुणवत्ता / गुणांक प्राप्त केलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची खालील टक्केवारीनुसार प्रवर्गनिहाय निवड यादी तयार करावी व त्याप्रमाणे प्रवेश द्यावा.

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | | - | १३% |
| अनुसूचित जमाती | | - | ७% |
| विमुक्त जाती | (अ) | - | ३% |
| भटक्या जमाती | (ब) | - | २.५% |
| भटक्या जमाती | (क) | - | ३.५% |
| भटक्या जमाती | (ड) | - | २% |
| इतर मागासवर्गीय | | - | १९% |

(३) शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक / निर्णयानुसार अपंग, सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले (ॲक्टीव्ह सर्व्हिसेस) / कर्मचारी तसेच माजी सैनिक यांची पाल्ये व खेळाडू ह्या वर्गवारीत विद्यार्थ्यांना त्यांच्या विहित टक्केवारीनुसार त्यांच्या संबंधीत खुल्या किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील राखीव जागांमधून आडवे (Horizontal) आरक्षण देण्यात यावे. 54

(४) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहील्यास त्या जागांपैकी एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीतजास्त २ टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय (S. B. C.) उमेदवारांस गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही घ्यावी.

(५) वरीलप्रमाणे २ टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय उमेदवारास प्रवेश देवूनही परिच्छेद २ मध्ये दर्शविलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात त्यांना विहित केलेल्या टक्केवारीनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या मागासवर्गीयांना इतर प्रवर्गातून गुणवत्तेनुसार खालील गटाअंतर्गत आंतरबदल (Inter-Changability) तत्वानुसार भरण्यात याव्या.

| | | | |
|---|---|---|---|
| गट १ : | (i) अनुसूचित जाती | (ii) अनुसूचित जमाती | |
| गट २ : | (i) विमुक्त जाती (अ) | (ii) भटक्या जमाती (ब) | |
| गट ३ : | (i) भटक्या जमाती (क) | (ii) भटक्या जमाती (ड) | (iii) इतर मागासवर्गीय |

(६) एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० टक्के जागांवर महिलांना प्रवेश देणे आवश्यक असल्याने खुल्या व सर्व राखीव प्रवर्गात ३० टक्के जागांवर महिलांना प्रवेश मिळेल याबद्दल दक्षता घ्यावी.

(७) मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार शैक्षणिक सत्र २००२-२००३ पासून वरील कार्यपद्धतीचा अवलंब करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

आपला,

प्रतिलीपी माहितीस्तव :

सुभाष बेलसरे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ

(१) सहायक कुलसचिव (सामान्य प्रशासन) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
(२) सहायक कुलसचिव (महाविद्यालयीन शाखा)
(३) सहायक कुलसचिव (गडचिरोली उपकेंद्र) गडचिरोली.